लोकमत सिंधुदुर्ग, मंगळवार, १४ ऑक्टोबर २०१४

# दोडामार्ग येथील व्याख्यानाला प्रतिसाद

कसई दोडामार्ग : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय व बँक ऑफ इंडिया दोडामार्ग शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तालुक्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत हळबे महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेसह 'देशाच्या विकासात हिंदी भाषेचे योगदान' या विषयावर प्रा. पी. एन. ढोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये व्याख्याने, काव्यवाचन, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचा समावेश होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम हिंदी भाषेच्या प्रसारासाठी लाभदायक ठरला. माध्यमिक विद्यालय, माटणे येथे 'भारत के विकास मे हिंदी का योगदान' या विषयावर आधारीत घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातील प्रथम तीन क्रमांकांना पाठ्यपुस्तके व शालेय साहित्य बक्षीस देऊन मुख्याध्यापकांच्या हस्ते गौरविण्यात आले. न्यू इंग्लिश स्कूल, दोडामार्ग येथे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय अशा दोन गटात घेण्यात आलेल्या काव्यवाचन स्पर्धेत माध्यमिक गटातून २२, तर कनिष्ठ महाविद्यालयातून २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन्ही गटातील तीन विजेत्यांना शालेय साहित्य बक्षीस देऊन शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कनिष्ठ महाविद्यालय, भेडशी येथे हिंदी भाषांतर्गत माध्यमिक स्तरावरील काव्यवाचन स्पर्धेत २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सर्व कार्यक्रमांचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा. पी. एन. ढेपे यांनी केले. परीक्षक म्हणून प्रा. एम. टी. बेग यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन भूषण सावंत व अनिल गावडे, आभार प्रा. एस. एन. खडपकर यांनी मानले.

या उपक्रमासाठी बँक ऑफ इंडिया शाखा दोडामार्गचे सहकार्य व प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. (वार्ताहर)